**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा उलटतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -लता श्रीहरी बाळबुधे

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास शपथेवर श्री जी.आर.हुंगे यांच्या मार्फत सुरू.</u>**

**१०.** माझे शिक्षण इय्यता १२ वी पर्यंत झालेले आहे. माझ्या वडीलांचे नाव वसंतराम महादेवराव तिवसे असे होते. माझे वडील सन २००८ मध्ये मयत झाले होते. माझ्या आईचे नाव कमलाबाई वसंतराव तिवसे असे होते. माझी आई दि.१७ एप्रिल,२०२२ मध्ये मयत झाली. माझे व माझ्या आईवडीलांचे संबंध चांगले होते. तसेच माझे संबंध माझ्या भावासोबत चांगले होते. माझे वडील सरकारी कार्यालयात नोकरीला होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांची शेवटपर्यंत प्रकृती चांगली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यांचा सन २००८ मध्ये अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईची प्रकृती शेवटपर्यंत चांगली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, तिला लखवा मारला होता. माझ्या आईला सन २०१०-२०११ मध्ये शरिराच्या एका बाजुने लखवा मारला होता. माझी आई मला व माझ्या भावांना ओळखत होती व ती बोलत होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सुरूवातीला ती अडखळत होती. ज्यावेळेस माझ्या आईला लखवा मारला त्यावेळी तिला समज होती.

**११.** माझ्या आईला लखवा मारल्यानंतर तिच्यावर मेडिकल हॉस्पीटल, नागपुर येथे उपचार केला व त्यानंतर नेरकर हॉस्पीटल येथे उपचार केला होता. माझ्या आईच्या उपचाराबाबत कागदपत्रे मी अभिलेखावर दाखल केलेली नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सदर कागदपत्रे माझ्या भावाकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला कधीही अर्धांगवायुचा आजार झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई शेवटपर्यंत माझ्या भावाकडेच राहत होती व तिचा संपुर्ण सांभाळ माझ्या भावानेच केलेला आहे.

**१२.** माझा भाऊ प्रदिप हा पेंटींगचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याला दारूचे व्यसन होते व त्याचे पत्नीसोबत पटत नव्हते हे मी खोटे आरोप केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रदिपच्या पत्नीने प्रदिपविरूध्द त्याबाबत तक्रार केलेली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या आईच्या मृत्यूपर्यंतचा व तिच्या तेरवीचा खर्च प्रतिवादी प्रदिप यांनीच केलेला आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सदर खर्च आम्ही पोरींनीच केलेला आहे. सदर खर्च पाच-दहा हजार झाला होता. माझे बँक अकाउंट आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यावेळेस माझे बँक खाते नव्हते व सदर पैसे माझ्या पतीकडुन घेउन मी दिले होते. मी माझ्या पतिची साक्ष नोंदविन. हे म्हणणे खरे नाही की, मी अथवा माझ्या पतिने कोणताही खर्च माझ्या आईवर केलेला नाही.

**प्रश्न-**वादमिळकत तुमच्या आईकडे कशी आली याबाबत तुम्हाला माहित आहे काय?

**उत्तर-**महित आहे. सदर वादमिळकत ही माझ्या आईला तिच्या वडीलाकडुन प्राप्त झाली होती.

माझ्या आईला तिच्या वडीलाकडुन वादमिळकत प्राप्त झाल्याबाबत दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. आता मला अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये सदर दस्तऐवज अभिलेखावर असल्याचे दिसुन येत नाही.

**प्रश्न-**वादमिळकत ही मारोती पाल यांच्या मालकीची होती याबाबत तुम्हाला माहित आहे काय?

**उत्तर-**होय. सदर वादमिळकत ही मारोती पाल यांच्या मालकीची होती.

**प्रश्न-**वादमिळकत ही चंद्राबाई बिंदुजी डोंगरे यांनी मारोती पाल यांच्याकडुन दि.०३/०५/१९६६ रोजी रजिस्टर विक्रीपत्रान्वये खरेदी केलेली आहे याबाबत तुम्हाला माहित आहे काय?

**उत्तर-** त्यावेळी माझा जन्मच झालेला नव्हता.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, चंद्राबाई ही कमलाबाईची आई होती. हे म्हणणे खरे आहे की, कमलाबाई ही चंद्राबाईची एकुलती एक मुलगी होती. हे म्हणणे खरे आहे की, चंद्राबाईच्या मृत्युनंतर वादमिळकत ही कमलाबाई यांच्या नावाने झाली. हे म्हणणे खरे नाही की, कमलाबाई हिने प्रतिवादी यांच्या नावाने दि.२७/१०/२०२० रोजी मृत्युपत्र करून दिले होते. आता मला दि.२७/१०/२०२० रोजीच्या मृत्युपत्राची सत्यप्रत दाखविण्यात आली. सदर मृत्युपत्र नोंदविण्यात आले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, सदर मृत्यूपत्र खोटे आहे. आता मला सदर मृत्युपत्रावरिल फोटो दाखविण्यात आला, सदर फोटो माझ्या आईचा आहे व त्यावर कमल वसंता तिवसे म्हणुन सही आहे. सदर मृत्युपत्रासोबत कमलाबाई तिवसे यांच्या नावाचा ७/१२ चा उतारा लावल्याचे दिसुन येते. तसेच सदर मृत्यूपत्रावर दोन

साक्षदार म्हणुन संजय मोतिसिंह सुर्यवंशी आणि श्रावण महादेवराव हेडाऊ यांचे फोटो आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यांना मी ओळखत नाही.

**प्रश्न-** वादमिळकत जमिन ही प्रतिवादी प्रदिप यांच्या नावाने आहे काय?

**उत्तर-**प्रदिप याने करून घेतली आहे.

**१४.** आता मला वादमिळकतीच्या ७/१२ च्या उता-याची सत्यप्रत दाखविण्यात आली त्यामध्ये प्रतिवादी यांचे नाव आहे. सदर ७/१२ च्या उता-याची सत्यप्रत असल्यामुळे त्यास **नि.क्र.२५** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत ही कमलाबाई यांची स्वयंसंपादित मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादमिळकत ही माझ्या आईची स्वयंसंपादित मिळकत असल्यामुळे त्यावर माझा व वादी क्र.२ यांचा काहीही हक्क नाही. साक्षीदार स्वत:हून सांगते की, कमलाबाई माझी आई असल्यामुळे तिच्या मिळकतीवर मी मुलगी म्हणुन माझा हक्क आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीचा मला लोभ सुटल्यामुळे मी प्रतिवादीविरूध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी प्रदिप हा आमचे काहीही करत नसल्यामुळे मी त्याच्याविरूध्द हा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि २१/०८/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड